# व्याजमुक्त हप्त्याने वीज बिल भरण्याची संधी

**प्रतिनिधी/मुंबई**

कोरोनाच्या काळात वीज ग्राहकांना भरमसाठ वीज बिले आली. त्यात रोजगार नसल्याने अनेक ग्राहकांनी वीज बिले भरली नाहीत. वीज ग्राहकावर ताण नको, यासाठी वीज कंपन्यांनी ग्राहकांना वीज बिल व्याजमुक्त हप्त्याने भरण्याची संधी दिली. अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने तात्पुरत्या काळासाठी दिलेल्या व्याजमुक्त ईएमआय सुविधेला ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या मुदतवाढीमुळे ग्राहक आता त्यांची बिले भरण्यासाठी ईएमआय पर्याय उपलब्ध करून घेऊ शकतात. वीजपुरवठ्यातील गैरसोय टाळू शकतात. ग्राहक थकबाकीची रक्कम भरण्यासाठी तीन मोफत ईएमआय उपलब्ध करून घेण्यास पात्र आहेत. यापूर्वी ईएमआय सुविधेचा पर्याय न स्वीकारलेले ग्राहक आता वेबसाइटवरील, कॉल सेंटरवरील किंवा ग्राहकसेवा केंद्रावरील किऑस्कवर जाऊन या सुविधेसाठी नोंदणी करू शकतात. व्याजमुक्त ईएमआय पर्यायाला केवळ सध्याच्या महिन्यापुरती मुदतवाढ देण्यात आली आहे.